नागरिकांची सनद

अद्ययावत सन २०२५

दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन,
पहिला मजला, कुशेष मेन्शन, कावसजी स्ट्रीट,
जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१.

अनुक्रमणिका

अ. क्र.	विषय	पृष्ठ क्र.
(१)	(२)	(३)
१.	प्रस्तावना, विभागाची रचना	१-२
२.	परिशिष्ट- १ दर्शनिका विभागाचे रचनात्मक विवरणपत्र	३
३.	परिशिष्ट- २ कार्यपूर्तीचे वेळापत्रक	४
४.	परिशिष्ट - ३ अधिकाऱ्यांची यादी व संपर्क/ दूरध्वनी	५
५.	परिशिष्ट- ४ कार्यालयाचे नाव पत्ता	६
६.	परिशिष्ट ५ सेवाहमी कायद्यांतर्गत दर्शनिका विभागकडून पुरविली जाणारी सेवा	७

दर्शनिका विभाग
नागरिकांची सनद

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील कलम ८ (१) (२) मधील तरतुदीनुसार यापूर्वी प्रसिध्द केलेल्या नागरिकांच्या सनदेत यथायोग्य सुधारणा करुन प्रस्तुत सनद प्रसिध्द करण्यात येत आहे.

सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्रमांक शाकानि-१००६/प्र.क्र.२३/२००६/१८ (र.व.का.) दि. ३१.०५.२००६ नुसार पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग असा नवीन मंत्रालयीन प्रशासकीय विभाग निर्माण करण्यात आला आहे. या मंत्रालयीन विभागाच्या अधिनस्त दर्शनिका विभाग कार्यरत आहे.

दि. ३१ ऑक्टोबर १९६४ पासून दर्शनिका विभाग महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारीत स्वतंत्र विभाग म्हणून अस्तित्वात आहे.

महाराष्ट्र राज्याचे गॅझेटिअर ग्रंथ (दर्शनिका) मराठी व इंग्रजी भाषेमधून प्रकाशित होतात. विभागाच्या जिल्हा गॅझेटिअर व महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर अशा दोन स्वतंत्र मालिका आहेत.

याशिवाय या विभागाकडे जिल्हा व राज्य गॅझेटिअर मालिकेबरोबरच भारतीय स्वातंत्र्य आंदोलन इतिहासाचे साधन सामुग्रीचे संकलन व प्रकाशन या योजनेअंतर्गत सन १८१८ पासून १९४२ पर्यंतच्या विविध कालखंडाचे १३ खंडात २० ग्रंथ प्रकाशित असून पुढील कालखंडाचे काम सुरु आहे. पूर्वप्रकाशित ग्रंथाच्या ई-बुक आवृत्तीच्या प्रतिलिपी करण्याचे काम सुरु आहे.

दर्शनिका विभागाकडून हाताळण्यात येणारे महत्त्वाचे कामकाज खालीलप्रमाणे आहे :-

इंग्रजी व मराठी भाषेतून जिल्हा व राज्य दर्शनिका ग्रंथाचे संकलन, लेखन व प्रकाशन, जिल्हा पुरवणी दर्शनिकांचे संकलन लेखन व प्रकाशन, जुन्या दर्शनिकांचे पुनर्मुद्रण व प्रकाशन, विविध प्रकाशन व संपादकीय धोरण ठरविणे, संशोधन पद्धती विहित करणे आणि त्यानुसार अंमलबजावणी करून घेणे, भारतीय स्वातंत्र्य आंदोलन इतिहास साधन सामग्रीचे खंड संपादन करून प्रकाशन करणे.

कार्यक्षेत्र - भौगोलिक : महाराष्ट्र राज्य/कार्यानुरुप : महाराष्ट्र राज्य

२. दर्शनिका विभागाची रचना-

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय या प्रशासकीय विभागाकडून दर्शनिका विभागाच्या कार्य विषयक बाबींवर धोरणात्मक निर्णय घेतले जातात. प्रशासकीय पातळीवर कार्यकारी संपादक व सचिव हे विभागाचे प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या नियंत्रणाखाली सहसंपादक, उपसंपादक, संशोधन अधिकारी व इतर कर्मचारी वर्ग कार्यरत आहे. या विभागाचे रचनात्मक विवरणपत्र परिशिष्ट १ येथे सोबत जोडले आहे.

३. कार्यपूर्तीचे वेळापत्रक-

या विभागामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवांच्या कार्यपूर्तीचे वेळापत्रक परिशिष्ट २ येथे जोडले आहे. विभागातील विविध शाखा व कार्य लक्षात घेऊन स्वतंत्र शाखा, कार्यरत अधिकाऱ्यांचे दूरध्वनी क्रमांक इ. माहिती परिशिष्ट ३ येथे जोडली आहे. तसेच विभागाचे नाव व पत्ता या बाबतची माहिती परिशिष्ट ४ मध्ये देण्यात आली आहे.

४. नियम/ शासन निर्णय-

या विभागाचे संबंधीत नियम अथवा महत्त्वाचे शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग येथे उपलब्ध आहे. तसेच संकेतस्थळाच्या मुख्यपृष्ठावर जलद दुवे या शीर्षाखाली दर्शनिका विभागाची माहिती उपलब्ध आहे. विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांची माहिती पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या कार्यक्रम अंदाजपत्रक या पुस्तिकेत उपलब्ध आहे.

५. (अ) गाऱ्हाणी/ तक्रारी यांचे निराकरण-

कार्यपूर्तीसाठी होणारा विलंब व अन्य काही गाऱ्हाणी असल्यास त्याबाबत संबंधीत शाखेच्या नियंत्रक अधिकारी यांच्याकडे तक्रार नोंदविता येईल. सदर तक्रारीची पूर्तता करण्याची जबाबदारी संबंधीत अधिकाऱ्यांची राहील. यानंतरही नागरिकांचे समाधान न झाल्यास नागरिकांना आपली तक्रार या विभागाचे कार्यकारी संपादक व सचिव यांच्याकडे करता येईल.

(ब) जनसामान्यांकडून सूचना

ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमूल्य सूचनांचा वेळोवेळी आढावा घेण्यात येऊन आवश्यकतेनुसार बदल करण्यात येईल.

परिशिष्ट १

दर्शनिका विभाग रचनात्मक विवरणपत्र
एकूण ३९ पदे (३३ नियमित पदे + ६ बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाचे पदे)

कार्यकारी संपादक व सचिव (०१)
|
सहसंपादक (०१)
|
उपसंपादक (०१)

आस्थापना शाखा

|
प्रशासकीय अधिकारी (०१)
|
अधीक्षक (०१)
|
सहायक (०१) (लेखाशाखा)
|
लिपिक टंकलेखक (०८)
|
बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाचे बहुउद्दशिय गट-ड कर्मचारी
|
दप्तरी (०१)
|
नाईक (०१)
|
शिपाई (०४)

मराठी लघुलेखक (०१)

सहायक (०१) (भांडारपाल)

सहायक (०१) (आस्थापना शाखा)

संशोधन शाखा

|
संशोधन अधिकारी (०३)
|
सहायक संशोधन अधिकारी (१२)
|
सहायक (०१) (संशोधन)

परिशिष्ट २
दर्शनिका विभाग: कार्यपूर्तीचे वेळापत्रक

शाखा	विषय	आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते	सेवा पुरविणारा अधिकारी/ कर्मचारी (दुरध्वनी क्रमांक)	सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल असा अधिकारी व त्यांचा दुरध्वनी क्रमांक	
				प्रथम अपिल	द्वितीय अपिल
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
संशोधन शाखा	जिल्हा व राज्य गॅझेटिअर निर्मिती, माहितीचे सर्वेक्षण व संकलन	१ वर्ष	सहायक संशोधन अधिकारी	सहसंपादक दूरध्वनी क्र.०२२-२२६७८७७९/ २२६९११२४ मो. नं. ९८१९९५७७९७	कार्यकारी संपादक व सचिव दूरध्वनी क्र.०२२-२२६७८७७९/ २२६९११२४ मो. नं. ९८१९९५७७९७
	लेखन	१ वर्ष	संशोधन अधिकारी व उपसंपादक, सहसंपादक		
	तज्ज्ञ तपासणी	६ महिने	संपादक मंडळ सदस्य		
	अंतिम संपादन	६ महिने	कार्यकारी संपादक व सचिव		
	मुद्रण	१ वर्ष	संबंधीत मुद्रणालय		
सेतू माधवराव पगडी संदर्भ ग्रंथालय	ग्रंथालयात उपलब्ध असलेले ग्रंथ संदर्भासाठी मागणी करणे	कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत ग्रंथ सूची मध्ये नमूद केलेले ग्रंथ ग्रंथालयातच उपलब्ध करुन देणे	भांडारपाल/ सहायक दूरध्वनी क्र.०२२-२२६७८७७९/ २२६९११२४ मो. नं. ८२९१३८११४२	सहसंपादक दूरध्वनी क्र.०२२-२२६७८७७९/ २२६९११२४	कार्यकारी संपादक व सचिव दूरध्वनी क्र.०२२-२२६७८७७९/ २२६९११२४

टिप- या विभागाद्वारे उपरोक्त सेवा पुरविल्या जातात. तथापि उपरोक्त सेवांचे विशिष्ट स्वरूप पाहता त्या महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत अधिसूचित करता येऊ शकत नाही.

परिशिष्ट ३

मुंबई येथील दर्शनिका कार्यालयात संबंधीत कामकाज करण्यासाठी असलेल्या विविध शाखा व संबंधीत अधिकारी यांचे दूरध्वनी क्रमांक व पत्ता खालीलप्रमाणे आहे:-

अ. क्र.	शाखा	संबंधीत नियंत्रक अधिकारी	विभागप्रमुख तथा नियंत्रण अधिकारी	पत्ता/ दूरध्वनी क्रमांक / ई- मेल
१.	संशोधन शाखा	सहसंपादक	कार्यकारी संपादक व सचिव	पहिला मजला, कुशेष मेन्शन, कावसजी स्ट्रीट, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१. ०२२-२२६७८७७९/ २२६९११२४ मो. नं. ९११९९५७७९७ mahagazetteers123@gmail.com
		उपसंपादक	सहसंपादक	
		संशोधन अधिकारी	उपसंपादक	
		सहायक संशोधन अधिकारी	संशोधन अधिकारी	
२.	आस्थापना	प्रशासकीय अधिकारी	कार्यकारी संपादक व सचिव	
		अधीक्षक	प्रशासकीय अधिकारी	
		सहायक	अधीक्षक	
		लिपिक- टंकलेखक	अधीक्षक	
३.	लेखा शाखा	अधीक्षक / सहायक	आहरण व संवितरण अधिकारी	
४.	ग्रंथालय	भांडारपाल	कार्यकारी संपादक व सचिव व प्रशासकीय अधिकारी	

परिशिष्ट ४
विभाग/ नाव क्षेत्रिय कार्यालये विषय, नाव व पत्ता

विभागाचे नाव व पत्ता	विषय
दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, पहिला मजला, कुशेष मेन्शन, कावसजी स्ट्रीट, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१. दूरध्वनी क्रमांक ०२२- २२६७८७७९/ २२६९११२४ मो. नं. ९८१९९५७७९७	इंग्रजी व मराठी भाषांमधून जिल्हा गॅझेटिअर व राज्य गॅझेटिअर ग्रंथ प्रकाशित करणे. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास: आधार साहित्य ग्रंथ प्रकाशित करणे. महात्मा गांधी संकलित वाङ्मय, स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोश, प्रकाशित ग्रंथाची ई- बुक आवृत्ती प्रकाशित करणे.

टिप- या विभागाचे राज्यस्तरीय एकच कार्यालय असून त्याचा पत्ता वरीलप्रमाणे आहे. या विभागाच्या अधिनस्त राज्यात क्षेत्रिय कार्यालय कार्यरत नाही.

परिशिष्ट ५

सेवाहमी कायद्यांतर्गत दर्शनिका विभागकडून पुरविली जाणारी सेवा

शाखा	विषय	आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते	सेवा पुरविणारा अधिकारी/ कर्मचारी (दुरध्वनी क्रमांक)	सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल असा अधिकारी व त्यांचा दुरध्वनी क्रमांक	
				प्रथम अपिल	द्वितीय अपिल
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
संशोधन शाखा	गॅझेटिअर विभागतर्फे प्रकाशित गॅझेटिअर ग्रंथाचे ई- बुक (सीडी) उपलब्ध करणे	कार्यालयीन कामकाजाचे १० दिवस (ई-बुकच्या उपलब्ध साठ्यानुसार)	सहायक/ सहायक संशोधन अधिकारी/ दूरध्वनी क्र.०२२-२२६७८७७९/ २२६९११२४	संशोधन अधिकारी (प्रथम अपिलीय प्राधिकारी) क्र.०२२-२२६७८७७९/ २२६९११२४	सहसंपादक (द्वितीय अपिलीय प्राधिकारी) दूरध्वनी क्र.०२२-२२६७८७७९/ २२६९११२४